# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा

दिनांक १५/०७/२०२४

**अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करणेबाबत**

मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम वर्ष एम.कॉम. या वर्गामध्ये प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांनी, त्यांनी निवडलेल्या अभ्यास केंद्रांवर (महाविद्यालयामध्ये) खालीलप्रमाणे कागदपत्रे शनिवार दि. ३१/०८/२०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

१) प्रवेशअर्ज (अभ्यासकेंद्र प्रत)
२) प्रवेशअर्ज (विद्यार्थी प्रत)
३) आधारकार्ड (मूळ व झेरॉक्स प्रत)
४) पात्रता परीक्षेचे गुणपत्रक (मूळ व झेरॉक्स प्रत)
५) माध्यमिक शिक्षण (इयत्ता १०वीचे) प्रमाणपत्र (मूळ व झेरॉक्स प्रत)
६) विद्यार्थ्यांच्या नावामध्ये बदल झालेला असल्यास त्याबाबतचा पुरावा (मूळ व झेरॉक्स प्रत)
७) पुढीलपैकी एक कागदपत्र (ने लागू असेल ते) (मूळ प्रत):

i) याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात अथवा विद्यापीठ विभागात घेतला असेल तर, संबंधित विभागाचे स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) आवश्यक आहे.

याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहिःस्थ विभागात घेतला असेल तर, बहिःस्थ विभागाचे स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) आवश्यक आहे.

याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा' या विभागामध्ये घेतला असेल तर स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) आवश्यक नाही.

ii) याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाव्यतिरिक्त इतर कोणत्याही विद्यापीठामध्ये किंवा इतर विद्यापीठ संलग्न महाविद्यालयामध्ये घेतला असेल तर संबंधित विद्यापीठाचे स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) आवश्यक आहे.

- अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करतेवेळी विद्यार्थ्याकडे स्थानांतर / स्थलांतर प्रमाणपत्र (T.C. Migration Certificate) नसेल तर विद्यार्थ्याने प्रवेश अर्जासोबत विहित नमुन्यातील हमीपत्र देणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र अभ्यास केंद्रावर जमा केल्यानंतरच विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित होईल.
- अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करण्यापूर्वी विद्यार्थ्याने प्रवेश अर्जातील वैयक्तिक तपशील (नाव, मोबाईल क्रमांक, इ-मेलआयडी, पत्ता, जन्म दिनांक इ.) काळजीपूर्वक तपासून पाहणे आवश्यक आहे. यामध्ये काही दुरुस्ती करावयाची असल्यास विहित नमुन्यातील अर्ज प्रवेश अर्जासोबत अभ्यासकेंद्रावर जमा करणे आवश्यक आहे.
- प्रवेश अर्ज (छापील प्रत) तसेच आवश्यक कागदपत्रे मुदतीत जमा न केल्यास प्रवेश निश्चित होणार नाही, याची प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## स्थलांतर / स्थानांतर प्रमाणपत्र जमा करण्याबाबत हमीपत्र

दिनांक:____/____/ २०२४

प्रति
मा. संचालक,
मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे

विषयः प्रवेश अर्ज जमा करणेसंदर्भात....

मी ________________________________________________________________________ विनंतीपूर्वक अर्ज करतो/करते की मी आपल्या विद्यापीठात दूरस्थ अध्ययन पद्धतीने प्रथम वर्ष एम. कॉम. या वर्गात प्रवेश घेण्यासाठी अर्ज केला असून माझा प्रवेश अर्ज क्रमांक ___________________ आहे. प्रवेश अर्जासोबत स्थानांतर (Transfer) प्रमाणपत्र / स्थलांतर (Migration) प्रमाणपत्र जमा करणे आवश्यक आहे. तथापि, सदर प्रमाणपत्र माझ्याकडे सध्या उपलब्ध नसून ते मिळविण्यासाठी मी यापूर्वी प्रवेश घेतलेल्या महाविद्यालय / विद्यापीठ येथे अर्ज केलेला आहे. सदर प्रमाणपत्र मी अभ्यास केंद्रावर विहित मुदतीत जमा करेन. सदर प्रमाणपत्र जमा केल्यानंतरच माझा प्रवेश निश्चित होईल याची मला माहिती आहे. तरी, माझा प्रवेश अर्ज कृपया जमा करून घेण्यात यावा, ही विनंती.

_______________________
(विद्यार्थ्याची सही)

_______________________
(विद्यार्थ्याचे नाव)

---

**For Study Centre use only**

Sign of Study Centre Coordinator:_________________________ Seal of Study Centre

---

# विद्यार्थी माहितीत दुरुस्ती करावयाचा अर्ज

दिनांक:____/____/ २०२४

प्रति
मा. संचालक,
मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे

**विषयः प्रवेश अर्जातील माहितीत दुरुस्ती करणेसंदर्भात....**

मी ________________________________________________________________विनंतीपूर्वक अर्ज करतो/करते की मी आपल्या विद्यापीठात दूरस्थ अध्ययन पद्धतीने प्रथम वर्ष एम. कॉम. या वर्गात प्रवेश घेण्यासाठी अर्ज केला असून माझा प्रवेश अर्ज क्रमांक ________________आहे. तथापि, माझ्या प्रवेश अर्जामध्ये भरलेल्या माहितीत पुढील दुरुस्ती करण्यात यावी, ही विनंती.

| तपशील | छापील प्रवेश अर्जामध्ये असलेली माहिती | माहितीत करावयाची दुरुस्ती |
|---|---|---|
| विद्यार्थ्यांचे नाव (इंग्लिशमधील) | | |
| विद्यार्थ्यांचे नाव (मराठीमधील) | | |
| पत्ता | | |
| मोबाईल क्रमांक | | |
| इ-मेल आयडी | | |
| इतर | | |

________________________
(विद्यार्थ्याची सही)

________________________
(विद्यार्थ्याचे नाव)

---

**For Study Centre use only**

Sign of Study Centre Coordinator:_________________________Seal of Study Centre

---